## मुकिंदपूर येथील श्रीराम साधना आश्रमात
# शिवलिलामृत पारायणाने श्रावण मास सोहळ्यास प्रारंभ



**नेवासाफाटा (वार्ताहर)–** नेवासा तालुक्यातील मुकिंदपूर चारी क्र. तीन जवळील रामनगर येथील श्रीराम साधना आश्रमात गुरुवर्य महंत सुनीलगिरी महाराज यांच्या उपस्थितीत, शिवलिलामृत पारायणासह हरि किर्तनाने श्रावण मास महोत्सवाचा प्रारंभ करण्यात आला.

यावेळी झालेल्या कीर्तन सोहळ्याला भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. मनुष्य जीवाच्या उध्दारासाठी श्रावण मासातील उपासनेने मनाला पवित्र करा, असे आवाहन महंत सुनीलगिरी महाराज यांनी यावेळी केले.

श्रावण मासानिमित्त येथे येणाऱ्या प्रत्येक श्रावणी सोमवारी विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. सकाळी ७ ते ७.३० जलाभिषेक, ७.३० ते ८ महाआरती, ८ ते २ शिवलिलामृत ग्रंथाचे पारायण, सायंकाळी ५ ते ६ हरिपाठ, सायंकाळी ७ ते ९ हरिकीर्तन असे कार्यक्रम साजरे होणार आहेत. श्रावणात आलेल्या पहिल्या सोमवारी श्री १०८ स्वामी आदित्यानंद महाराज भारती यांचे कीर्तन झाले. अंबादास सरोदे यांच्या हस्ते संतपूजन करण्यात आले. खरवंडी येथील भजनी मंडळाचा वतीने भजनाचे कार्यक्रम झाले.

यावेळी वडगाव गुप्ता येथील सेवेकरी अण्णासाहेब थोरात यांच्या वतीने दुपारच्या सत्रात फराळ प्रसाद वाटप करण्यात आले, तर किर्तनानंतर माधवराव थोरात, माऊली दिंडी खरवंडी, लोहगाव येथील शिवभक्त शिवाजी सोनवणे यांच्या वतीने महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. यावेळी झालेल्या कीर्तन सोहळ्या प्रसंगी महंत गोपालानंदगिरी महाराज, के. एम. बाबा फाटके, संतसेवक वैभव निकम, पोपटराव निपुंगे, सिताराम निपुंगे यांच्यासह भाविक उपस्थित होते.

# रुद्र पूजेने ज्ञानाची प्राप्ती होऊन मनातील इच्छा पूर्ण होतात
## स्वामी वैशंपायन : राहाता येथे रुद्र पूजा मोठ्या उत्साहात

**राहाता (वार्ताहर)–** रुद्र म्हणजे शिव आणि शिव म्हणजे पूर्ण शुद्ध ज्ञान. शिवपूजा म्हणजे ज्ञानाची पूजा. रुद्रपूजा श्रावण मासात केल्याने ज्ञानाची प्राप्ती होऊन आपल्या सर्व इच्छा पूर्ण होतात, असे स्वामी वैशंपायन यांनी सांगितले.

राहाता येथील वीरभद्र मंदिरासमोर भव्य प्रांगणात श्री श्री रविशंकर गुरुजी यांच्या आशीर्वादाने कार्यरत असलेल्या आर्ट ऑफ लिव्हिंग ग्रुपच्या वतीने महारुद्र पूजेचे आयोजन करण्यात आले होते. आर्ट ऑफ लिव्हिंगचे स्वामी वैशंपायन व इतर गुरुवर्यांच्या मंत्र उच्चाराने रुद्र पूजा संपन्न होत असताना परिसर शिवमय झाला होता. गेल्या पाच दिवसांपासून याच ठिकाणी भक्तिमय वातावरणात सुरू असलेल्या शिवमहापुराण कथेला कथाकार विकासानंद मिसाळ महाराज उपस्थित होते.



याप्रसंगी नाशिक येथील गायक सारंग गोसावी व त्यांच्या गायक व वादक वृंदाने अनेक शिवभक्तीमय भजन व गीतांच्या सुमधुर व संगीतमय गायनाने उपस्थित शिवभक्तांना मंत्रमुग्ध केले. रुद्र पूजेचे महत्व विशद करताना स्वामी वैशंपायन यांनी पूजा सुरू करण्यासाठी प्राणायाम, संकल्प, ध्यान, सत्संग व भजन आरती या क्रमाने रुद्र पूजा करावी, असा संकल्प करताना आपल्या सर्व इच्छा शिवचरणी सोडून द्याव्यात. ध्यान हे मंत्र स्नान आहे, असे सांगितले.

या शिव महारुद्र पूजेमध्ये मोठ्या संख्येने भाविकांनी सहभाग घेऊन श्रावण मासातील पहिल्या सोमवारी अध्यात्मिक व मानसिक सुखाचा मनसोक्त आनंद घेतला. आर्ट ऑफ लिव्हिंगचे सर्व सदस्य राहाता तालुका समन्वयक सुनील सदाफळ, राहुल सदाफळ, डॉ. स्वाधीन गाडेकर, ज्ञानेश्वर सदाफळ, नितीन भडांगे, सागर सदाफळ, रामकृष्ण लोंढे, सर्जेराव मते, अजय आग्रे, प्रज्वल सोनुले, आनंद काले, रवींद्र जेजुरकर, हेमंत गिरमे, चंद्रशेखर कार्ले, दत्ता सदाफळ, विजय सदाफळ, डॉ. महेश गव्हाणे, सचिन अग्रवाल, गोपी पिपाडा, दीपक सापिके, हरीओम कुलकर्णी, सुदर्शन सदाफळ, राज सदाफळ तसेच अन्यांनी रुद्र पूजा संपन्नतेसाठी परिश्रम घेतले. रुद्र पूजा संकल्पासाठी उपस्थित असलेल्या सर्व भाविकांना रुद्राक्ष भेट देण्यात आले. त्यानंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते.

- आर्ट ऑफ लिव्हिंगने आयोजित केलेल्या रुद्र पूजा व महापुराण कथेसाठी जनसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी भरीव देणगी दिली. तसेच या धार्मिक कार्यक्रमासाठी डॉ. सुजय विखे पाटील व शालिनीताई विखे पाटील यांनी भेट देऊन या धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन केल्याबद्दल आर्ट ऑफ लिव्हिंगच्या सर्व सदस्यांचे कौतुक केले.

- आर्ट ऑफ लिव्हिंगचे प्रणेते श्री श्री रविशंकर गुरुजी यांच्या संकल्पनेतून श्रावण मास निमित्त आयोजित शिव महापुराण कथेसाठी व रुद्र पूजेसाठी भाविकांनी मोठ्या प्रमाणात उपस्थित राहून सहभाग घेतला. तसेच जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटीलब व परिसरातील नागरिकांनी या धार्मिक कार्यक्रमासाठी मोलाचे सहकार्य केले, त्याबद्दल सर्वांचे आर्ट ऑफ लिव्हिंगच्यावतीने आभार.

**–सुनील सदाफळ**, राहाता तालुका समन्वयक

# नेवासा फाट्यावर पत्रकाराला मारहाण

**नेवासा (तालुका वार्ताहर)–** काल रात्री नेवासा फाटा येथे एका पत्रकारास मारहाण करण्यात आल्याची घटना घडली.

नेवासा फाटा येथे पत्रकार शंकरराव नाबदे यांना विनाकारण दमदाटी करत मारहाण करण्यात आली. भांडण सोडवण्यासाठी आलेल्या मराठा महासंघाचे जिल्हा सुकाणू समितीचे अध्यक्ष गणेश झगरे यांना देखील मारहाण करण्यात आली. या प्रकरणी नेवासा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पत्रकार शंकरराव नांबदे आपल्या वडिलांना उपचारासाठी नेवासा फाटा येथील रुग्णालयात घेवून आले होते. ते नेवासा फाटा येथे उभे असताना त्यांच्यावर अचानक हल्ला करत मारहाण करण्यात आली. भांडण शांत करण्यासाठी पुढे आलेल्या गणेश झगरे यांनाही जबर मारहाण करण्यात आली आहे. घटनेनंतर जखमीं झगरे यांना तत्काळ उपचारासाठी हॉस्पीटलमध्ये दाखल करण्यात आले. या घटनेचा नेवासा शहर प्रेस क्लब व नेवासा तालुक्यातील पत्रकार बांधवांकडून निषेध व्यक्त करण्यात आला.

यातील आरोपीवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी निवेदनात करण्यात आली. याप्रसंगी नेवासा प्रेस क्लबचे गुरुप्रसाद देशपांडे, अध्यक्ष मोहन गायकवाड, अशोक डहाळे, सुधीर चव्हाण, कैलास शिंदे, नाना पवार, सुहास पठाडे, शाम मापारी, मकरंद देशपांडे, पवन गरुड, रमेश शिंदे, शंकर नाबदे आदी उपस्थित होते.

# पुणे-नाशिक महामार्गावर अपघात झाल्यास तक्रार थेट दिल्लीला
## ठेकेदारावर 'सदोष मनुष्यवधाचा' गुन्हा दाखल होणार- आ. खताळ

**संगमनेर (तालुका प्रतिनिधी)–** पुणे-नाशिक राष्ट्रीय महामार्गावर सुरू असलेल्या सिमेंट काँक्रिटीकरण कामामुळे सातत्याने होणाऱ्या अपघातांमुळे अनेक निष्पाप जीवांना आपले प्राण गमवावे लागत आहेत. त्यामुळे या अपघातांना जबाबदार असलेल्या ठेकेदारांवर थेट सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्याचे स्पष्ट आदेश आ. अमोल खताळ यांनी संबंधित विभागांना दिले आहेत.

संगमनेर येथे नुकत्याच आयोजित करण्यात आलेल्या बैठकीत त्यांनी हा इशारा दिला. या बैठकीस राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे अधिकारी, आरटीओ, महामार्गावरील पोलिस, संबंधित हद्दीतील पोलिस निरीक्षक, आरोग्य, कृषी विभागाचे प्रतिनिधी आणि विविध क्षेत्रातील अधिकारी उपस्थित होते. या बैठकीत आ. खताळ म्हणाले, माझा विकास कामांना विरोध नाही. मात्र कोणतेही काम नियमबाह्य किंवा अपूर्ण राहून नागरिकांच्या जिवाला धोका होऊ देऊ नये. कामे ही सुरक्षेच्या दृष्टिकोनातून काटेकोर आणि नियमानुसार व्हायला हवीत. अन्यथा संबंधित ठेकेदारावर कारवाई अनिवार्य असेल. अपघात अथवा रस्त्यावर खड्डे व अपूर्ण सुविधा आढळल्यास नागरिकांनी थेट १०३३ या टोल-फ्री क्रमांकावर तक्रार करावी,



असे आवाहन आमदार खताळ यांनी केले. ही तक्रार थेट दिल्लीपर्यंत पोहोचते आणि याची तत्काळ दखल घेतली जाते. त्यामुळे नागरिकांनी न घाबरता याचा वापर करावा, असेही त्यांनी सांगितले.

चंदनापुरी घाटात काही दिवसांपूर्वी घडलेल्या शालेय बस अपघाताची बैठकीत गांभीर्याने दखल घेण्यात आली. या पार्श्वभूमीवर तालुक्यातील सर्व शालेय वाहनांची आरटीओमार्फत तातडीने तपासणी करण्यात यावी, असे आदेश देण्यात आले. मात्र यावेळी थेट दंडात्मक कारवाई न करता, केवळ सूचना देऊन पालकांची आणि शाळांची जबाबदारी निश्चित करण्याचे निर्देश आ. खताळ यांनी दिले.

कुंभमेळा तोंडावर आलेला असताना महामार्गाचे सिमेंट काँक्रिटीकरणाचे काम अर्धवट ठेवणे म्हणजे भविष्यात अपघातांना आमंत्रण देणे होईल, असा इशाराही आमदार खताळ यांनी दिला. त्यामुळे काम तातडीने पूर्ण करून संपूर्ण मार्ग सुरक्षीत करावा, असे त्यांनी अधिकाऱ्यांना बजावले. अपघात रोखण्यासाठी आणि नागरिकांचे संरक्षण करण्याच्या दृष्टीने ही बैठक अत्यंत महत्त्वपूर्ण ठरणार असून, यामधून घेतलेले निर्णय राबवण्याची जबाबदारी संबंधित अधिकाऱ्यांवर सोपवण्यात आली आहे.

# निवडणूक आयोगावर 'वॉच'
## पृथ्वीराज बाबांच्या नेतृत्वात काँग्रेसचा मोठा प्लॅन!

**मुंबई–** महाराष्ट्रातील आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका जसजशा जवळ येत आहेत, तसतशी राजकीय घडामोड अधिकच वेग पकडत आहे. काँग्रेस पक्षाने या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर जोरदार तयारी सुरू केली असून, पक्षाने आता निवडणूक आयोगाच्या मतदार यादीवर बारीक मवॉचफ ठेवण्याचा निर्णय घेतला आहे.

माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली यासाठी एक विशेष समिती स्थापन करण्यात आली आहे. या समितीचे कार्यक्षेत्र केवळ मतदार यादीच्या पडताळणीपुरते मर्यादित नसून, ते थेट पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या २०१४ च्या कथित आचारसंहिता भंगाच्या प्रकरणाला आव्हान देण्यापर्यंत विस्तारले आहे.

**चव्हाण यांच्या नेतृत्वाखालील समितीचे दुहेरी आव्हान!**

काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ आणि माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांच्यासह काँग्रेसच्या वरिष्ठ नेत्यांनी नुकतीच एक पत्रकार परिषद घेतली, ज्यात या नव्या घडामोडींची माहिती दिली. या समितीची स्थापना मुख्यत्वे दोन महत्त्वाच्या उद्दिष्टांसाठी करण्यात आली आहे.

**राहुल गांधींच्या आरोपांची सत्यता पडताळणे**

काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी यापूर्वी महाराष्ट्र निवडणूक आयोगावर काही गंभीर आरोप केले होते. विशेषतः, विधानसभा निवडणुकीपूर्वी अवघ्या चार महिन्यांत मतदारसंख्येत अचानक ४१ लाखांची वाढ झाल्याचा त्यांचा दावा होता.

# प्रदेश काँग्रेसच्या सरचिटणीसपदी प्रा. प्रकाश सोनवणे यांची नियुक्ती

**मुंबई (प्रतिनिधी)–** धुळे जिल्ह्यातील साक्री तालुक्याचे सुपुत्र प्रा. प्रकाश सोनवणे यांची महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसच्या सरचिटणीसपदी नियुक्ती करण्यात आली आहे. प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी महत्वाच्या पदावर नियुक्ती करून प्रा. सोनवणे यांच्यावर विश्वास व्यक्त केला आहे.



प्रा. प्रकाश सोनवणे हे काँग्रेसचे जुने आणि निष्ठावंत कार्यकर्ते आहेत. मुंबईतील भवन्स महाविद्यालयात अध्यपनाचे कार्य करत असताना प्रा. सोनवणे यांचा संपर्क तत्कालीन काँग्रेस नेते पी. के. अण्णा पाटील यांच्याशी आला आणि ते काँग्रेस पक्षात ओढले गेले. प्रा. सोनवणे यांनी युवक काँग्रेसमधून आपल्या राजकीय कारकिर्दीला सुरुवात केली. चळवळीतील कार्यकर्ता असल्याने प्रा. सोनवणे पक्षाच्या प्रत्येक आंदोलनात आघाडीवर असायचे. मुंबईत राहून त्यांनी काँग्रेस पक्षात स्वतःचे स्थान निर्माण केले. दिवंगत गोविंदराव आदिक, माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण, माजी प्रदेशाध्यक्ष माणिकराव ठाकरे यांचे विश्वासू कार्यकर्ते अशी प्रा. सोनवणे यांची ओळख आहे. महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसच्या शिक्षक विभागाचे अध्यक्ष म्हणून कार्यरत असलेल्या प्रा. सोनावणे यांनी राज्य सरकारशी संघर्ष करून कायम विनाअनुदानित शाळेतील शिक्षकांना न्याय मिळवून दिला आहे. लोकसभा निवडणुकीच्या दरम्यान काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी महाराष्ट्रात काढलेल्या भारत जोडो यात्रेत प्रा. प्रकाश सोनवणे सहभागी झाले होते.

## राजस्थान युवक मंडळाच्यावतीने संगमनेरात
# श्रावण मासानिमित्त कीर्तन व व्याख्यानांचे आयोजन

**संगमनेर (तालुका प्रतिनिधी)–** पवित्र श्रावण मासानिमित्त शनिवार दि. २ ऑगस्टपासून राजस्थान युवक मंडळाच्या वतीने तीन दिवसांच्या धार्मिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आल्याची माहिती मंडळाचे अध्यक्ष मनीष मालपाणी यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली आहे. या कार्यक्रमांना तीनही दिवस मोठ्या संख्येने उपस्थित राहून श्रोत्यांनी लाभ घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले आहे.

श्रावण महिन्याच्या पावन पर्वकाळाचे औचित्य साधून मागील काही वर्षांपासून सातत्याने मंडळाच्या वतीने तीन दिवसीय उपक्रमाचे आयोजन केले जात आहे. शनिवार, दि. २ ऑगस्ट २०२५ रोजी सायंकाळी सात ते साडेआठ या वेळेत बुलढाणा येथील प्रसिद्ध कीर्तनकार पुरुषोत्तम महाराज पाटील यांचे कीर्तन आयोजित करण्यात आले आहे. रविवार, दि. ३ ऑगस्ट आणि सोमवार, दि. ४ ऑगस्ट असे सलग दोन दिवस सायंकाळी ७ ते ८:३० या वेळेत प्रेरक व्याख्याते आणि गीता परिवाराचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष डॉ. संजय



मालपाणी यांचे 'विषादातून विवेकाकडे' 'ज्ञानेश्वरी भाव यात्रा' या विषयावर व्याख्यान होणार आहे. मालपाणी लॉन्स, कॉलेज रोड, संगमनेर येथे होणाऱ्या या कार्यक्रमास प्रवेश सर्वांसाठी विनामूल्य आहे. सर्वांसाठी खुर्च्यांची आसन व्यवस्था असणार आहे. कार्यक्रम वेळेवर सुरू होऊन वेळेवर संपेल, त्यामुळे श्रोत्यांनी वेळेच्या अगोदर दहा मिनिटे उपस्थित राहून सहकार्य करावे, असे आवाहन मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे. सन-२०२५ हे मंडळाच्या अमृतमहोत्सवाचे वर्ष आहे. यंदाच्या वर्षी अनेक सांस्कृतिक धार्मिक उपक्रम आयोजित केले जाणार असल्याची माहिती कार्याध्यक्ष सुमित अट्टल, उपाध्यक्ष सागर मणियार, सचिव कल्पेश मर्दा, सहसचिव कृष्ण असावा, खजिनदार प्रतीक पोफळे, सहखजिनदार वेणुगोपाल कलंत्री यांनी दिली असून कार्यक्रमाच्या नियोजनासाठी सर्व पदाधिकारी व कार्यकारणी सदस्य कार्यरत आहेत.

## पान १ वरुन

### अमेरिकेकडून भारतीय वस्तूंवर...

त्यांनी भारताला पाकिस्तानसोबतचा संघर्ष संपवण्याचे आवाहन केले होते यामुळे हा मोठा संघर्ष थांबला असल्याचे म्हटले. भारत आणि पाकिस्तानमध्ये युद्धबंदी झाल्यापासून ट्रम्प यांनी जवळपास २० हून अधिक वेळा युद्धबंदीचे श्रेय घेतले आहे. भारताने यावर स्पष्टपणे नकार देऊनही ट्रम्प सतत हा मुद्दा उस्थित करत आहेत.

### सहकार धोरणामुळे चळवळीला नवी दिशा

काही मंडळीनी आता 'सहकार विषय राज्य सूचीतला आहे. इथे केंद्राचे काम काय,' असे विचारून प्रश्नचिन्ह उपस्थित होते. कृषी व अर्थ या मूलभूत क्षेत्रांशी सहकार चळवळ मोठ्या प्रमाणात जोडली गेली आहे. या दोन्ही विषयांमध्ये राज्य व केंद्र सरकारची धोरणे पूरक असतात. सहकारी साखर कारखानदारीत शेतकरी मालक असतो. कारखान्याला होणाऱ्या फायद्यातील वाटा त्याला मिळतो. त्यातून शेती क्षेत्रात सुधारणा होते. खासगी साखर कारखानदारीत असे होत नाही. त्याच्या कारभारावर शेतकऱ्याचे नियंत्रण नसते.

सहकार राज्याचा विषय आहे, असे सांगणाऱ्यांनी केंद्राने वठविलेली महत्त्वाची भूमिका सोयीस्करपणे दुर्लक्षित केली. केंद्रात पूर्वी कृषी, सहकार व शेतकरी कल्याण मंत्रालय होतेच. 'इफको', 'कृभको' या खत उत्पादक कंपन्या पूर्णतः सहकार क्षेत्रातील आहेत. दूध धंद्यात सहकाराच्या माध्यमातूनच 'अमूल' जागतिक ब्रँड म्हणून नावारूपाला आला. हे प्रकल्प बहुराज्यीय म्हणावेत असेच आहेत. सहकाराचा मार्ग स्वीकारत जगानेही प्रगतीची शिखरे गाठल्याचे दिसते. अमेरिकेसारख्या महासत्तेकडे पाहिले तर तेथे सहकारी तत्त्वावर काम करणाऱ्या नऊशेहून अधिक वीजनिर्मिती संस्था आहेत. त्यातून २५ टक्के जनतेला वीज मिळते. बँकांच्या जागतिक क्रमवारीत जपानची कृषी सहकारी बँक चोवीसाव्या क्रमांकावर आहे.

मग महाराष्ट्रातील सहकार चळवळ इतिहासजमा झाली, असे म्हणण्याच्या स्थितीत का आली? राज्यातील एकतीस जिल्हा बँकांपैकी आठ सोडल्या तर बाकी जवळपास डबघाईला आल्या आहेत. केवळ राजकीय फायद्यासाठी कर्जपुरवठा, एवढाच जणू त्यांचा नियम बनला आहे! कृषि कर्जवाटपाची रक्कम ४४ हजार कोटींवरून ३५ हजार कोटी रुपयांपर्यंत घसरली आहे. कर्जमाफी देऊनही स्थिती अशी गंभीर आहे. तोट्यातील बँकांची संख्या वाढतच आहे. राज्यात आज २१हजार प्राथमिक सहकारी संस्था आहेत. यापैकी एकूण १० हजार ९०१ प्राथमिक कृषी पतसंस्था तोट्यात आहेत. केवळ कर्ज देणे आणि वसुल करणे यापुढे या संस्थांचा कारभार गेला नाही. नागरी सहकारी बँकांची अवस्थाही फार बरी नाही. अनेक बँका मल्टीस्टेट होण्याचा विचार करीत आहेत.

याचे एकमेव कारण सहकारी संस्थांना असलेले जाचक नियम दाखवून कायद्याच्या कचाट्यात अडकविण्याचा होणारा प्रयत्न सातत्याने झाला. ज्यांच्याकडे जबाबदारी होती त्यांनी यापूर्वी कधीही या चळवळीला संरक्षण देण्याच्या दृष्टीने भूमिका पार पाडली नाही. सहकार चळवळीतील कार्यकर्ते असताना केंद्र सरकारने सहकार मंत्रालयातून सुरू केलेल्या धाडसी निर्णयाच्या अमंलबजावणीचा मोठा दिलासा सहकार चळवळीला दिलासादायक ठरत आहे.

यापूर्वी सहकारी साखर कारखान्यावर असलेला आयकराचा बोजा कमी करून सुमारे दहा हजार कोटी रुपये माफ करण्याच्या निर्णयामुळे सहकारी साखर कारखानदारी तग धरू शकली. इथेनॉल निर्मितीचे धोरण असो की, शेतकरी हितासाठी एआरपीच्या रकमेत वाढ करण्याच्या निर्णयामुळे साखर धंद्याला स्थैर्य मिळत आहे. प्रत्येक गावात असलेली प्राथमिक सेवा सहकारी सोसायट्या ग्रामीण अर्थव्यवस्थेचा आत्मा आहे. त्यांना उर्जितावस्था प्राप्त करून देण्यासाठी आता नव्या सहकार धोरणात विशेष प्राधान्य देण्यात आले आहे.

प्राथमिक सेवा सहकारी सोसायट्यांना अर्थिक उत्पन्न उपलब्ध करून देण्यासाठी १५० हून अधिक व्यवसाय सुरू करण्याची परवानगी दिल्याने सोसायट्यांना नवा चेहरा देण्याचा केंद्रीय सहकार मंत्रालयाचा निर्णय महत्वपूर्ण ठरणारा आहे. देशातील सर्वच संस्थाचे संगणीकरण सुरू झाले आहे. राज्यातील १२ हजार संस्थांनी यामध्ये आघाडी घेतली. याचाच अर्थ सेवा सहकारी सोसायट्यांच्या प्रतिनिधींना यामध्ये आता उत्साह वाटतो हे या धोरणाचे यश मानले पाहीजे.

गाव तेथे सहकारी संस्था यावर आता केंद्रीय सहकार मंत्रालयाचा भर आहे. यातून सर्व सामान्य माणूस सहकार चळवळीशी जोडला जाईल. देशाच्या सर्वांगीण विकासाचे स्वप्न सहकाराच्या माध्यमातूनच साकार होईल, यात शंका नाही. त्यातील शेती, अर्थकारण यामध्ये केंद्राची भूमिका महत्त्वाची ठरत आहे. ती आता अधिक सक्षमपणे वठविण्याचे मोदी सरकारचे धोरण आहे.

महाराष्ट्र, गुजरात व कर्नाटक राज्यांमध्ये मोठ्या प्रमाणात विकसित झालेल्या सहकारी चळवळीची पाळेमुळे देशात दूरवर पोहोचली पाहिजेत, याच हेतूने केंद्रीय सहकार मंत्रालयाची स्थापना आणि त्या अनुषंगाने राष्ट्रीय सहकार धोरण देशात लागू होणे ही आंतरराष्ट्रीय सहकार वर्षात सहकार चळवळीला मिळालेली मोठी भेट म्हणावी लागेल. सहकार चळवळीला नव्या जोमाने भरारी घेण्यासाठी केंद्रीय सहकार मंत्रालयाचे निर्णय आणि धोरण निश्चित उपयुक्त ठरणार आहेत. सहकाराच्या बळकटीसाठी सुरू झालेल्या प्रयत्नांचे स्वागतच केले पाहीजे, असे या चळवळीतील कार्यकर्ता म्हणून मला मनापासून वाटते...

### मुळा, भंडारदरा, निळवंडेत...

असून हे पाणी जायकवाडी धरणाकडे झेपावत आहे.

गत पाच सहा दिवसांपासून पाणलोटात पाऊस कोसळत असल्याने मुळा, प्रवरा नदी दुथडी वाहत आहेत. त्यामुळे दोन्ही धरणांमध्ये नवीन पाण्याची आवक वेगाने होत आहे. मुळा धरणात काल सकाळी पाणीसाठा २२४३६ दलघफू होता. त्यात ३१६ दलघफूची भर पडून हा साठा सायंकाळी २२७५२ दलघफूवर पोहचला. सकाळी कोतूळ येथील मुळा नदीचा विसर्ग १०३४२ क्युसेक होता. पण नंतर पावसाचा वेग मंदावल्याने सायंकाळी हा विसर्ग ५९९० क्युसेक होता.

भंडारदरातील साठा ९६४९ दलघफू कायम ठेऊन सकाळी ६१७६ तर सायंकाळ ६०८२ क्युसेक सुरू होता. हे पाणी निळवंडेत दाखल होत असल्याने या धरणातील पाणीसाठा ७३७१ दलघफू झाला होता. या धरणातून प्रवरा नदीत सकाळी ९३८१ क्युसेकने सोडण्यात येत होते. सायंकाळी तो ५९९६ क्युसेकपर्यंत घटविण्यात आला.

### लाडकी बहिणींसाठी जुलैच्या...

माहितीच्या आधारे जून २०२५ पासून या २६.३४ लाख अर्जदारांचा लाभ तात्पुरत्या स्वरूपात स्थगित करण्यात आला आहे.

### राज्य सहकारी संघाच्या चाव्या...

वसंतदादा पाटील सभागृहात मतमोजणीस सुरुवात केली आणि दुपारपर्यंत निकाल घोषित केला. निकालाची घोषणा होताच विजयी उमेदवारांच्या कार्यकर्त्यांनी एकच जल्लोष करीत फटाक्यांची आतिषबाजी केली.

मतमोजणीदरम्यान, जिल्हा सहकारी बोर्ड मतदार संघात तीन उमेदवारांना समान मते मिळाल्याने, त्यांना चिठ्ठी काढून विजयी घोषित करण्यात आले. यात लातूर विभागातून रामकृष्ण मारुतीराव बांगर, अमरावती विभागातून विलास सुधाकर महाजन आणि नागपूर विभागातून प्रमोद शंकरराव पिपरे यांचा चिठ्ठीद्वारे विजय झाला.

या निवडणुकीत संघाचे माजी अध्यक्ष प्रताप बाजीराव पाटील यांना कोल्हापूर विभागातील मतदार संघात, तर संघाचे माजी अध्यक्ष ॲड. सुहासराव भगवंतराव तिडके यांचा अमरावती विभाग मतदार संघात पराभव झाला आहे.

विजयी झालेले काही प्रमुख उमेदवार

विभागीय सहनिबंधक सहकारी संस्थांचे वैधानिक कार्यक्षेत्रनिहाय जिल्हा सहकारी बोर्ड प्रतिनिधी मतदार संघ:

प्रवीण यशवंत दरेकर (मुंबई विभाग - बिनविरोध)
हिरामण साहेबराव सातकर (पुणे विभाग - बिनविरोध)
धनंजय सर्जेराव कदम (कोल्हापूर विभाग)
रामकृष्ण मारुतीराव बांगर (लातूर विभाग - चिठ्ठीद्वारे)

राज्यस्तरीय संघीय सहकारी संस्था प्रतिनिधी:
प्रकाश यशवंत दरेकर (मुंबई - बिनविरोध)

इतर संस्था सभासद प्रतिनिधी:
संजीव राजाराम कुसाळकर (पुणे)
नितीन धोंडीराम बनकर (मुंबई)

महिला प्रतिनिधी:
जयश्री सोमा पांचाळ (मुंबई - बिनविरोध)
दिपश्री नितेश नलवडे (इचलकरंजी-कोल्हापूर - बिनविरोध)

### देवस्थानच्या दोन कर्मचाऱ्यांच्या...

ज्या ॲप्सना परवानगी होती, त्यांच्याव्दारे देवस्थानला नक्की किती आर्थिक लाभ झाला, याची चौकशी सुरू आहे. देवस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी जी. के. दरंदले यांना दोन वेळा चौकशीसाठी बोलावून माहिती मागवण्यात आली. मात्र, अद्याप त्यांनी कोणतीही स्पष्ट माहिती दिलेली नाही.

तपास तांत्रिक स्वरूपाचा असून अनेक गोष्टींची पडताळणी आवश्यक असल्याने अद्याप कोणालाही गुन्ह्यात आरोपी ठरवलेले नाही, आत्महत्या केलेले उपमुख्य कार्यकारी अधिकारी नितीन शेटे यांना चौकशीसाठी कधीही बोलावण्यात आले नव्हते, असेही अधीक्षक घार्गे यांनी स्पष्ट केले.

**प्रतिष्ठित कंपन्यांच्या नावाचा वापर**

या प्रकरणात काही ॲप्स प्रतिष्ठित कंपन्यांचे असल्याचे भासवले जात होते, ज्यामार्फत अयोध्या, वैष्णवदेवी यासारख्या प्रसिध्द तीर्थक्षेत्रांवरही सेवा दिल्या जातात. मात्र, अशा कंपन्यांचे देवस्थानांशी नेमके कोणत्या स्वरूपाचे करार होते, हे स्पष्ट व्हायचे आहे. विविध देवस्थानांशी पत्रव्यवहार करून माहिती मागवण्याचे काम सध्या सुरू आहे, असे अधीक्षक घार्गे यांनी सांगितले.